# मुंबई मेट्रो ३च्या दिनदर्शिकेत विद्यार्थ्यांची चित्रे

मुंबई : जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्च्या विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या चित्रांचा समावेश मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमार्फत प्रकाशित करण्यात येणाऱ्या २०१९ मधील दिनदर्शिकेमध्ये करण्यात येणार आहे. दिनदर्शिकेमध्ये सहा चित्रांचा समावेश असेल. जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्च्या विद्यार्थ्यांच्या चित्रांचे प्रदर्शन एमएमआरसीच्या मुख्य कार्यालयात झाले. मुंबई मेट्रो ३ च्या सर्व पॅकेजची एकूण २० चित्रे प्रदर्शनात पाहायला मिळाली. विद्यार्थ्यांनी मुंबई मेट्रो ३ च्या कामाचा आढावा घेणारी चित्रे कॅनव्हासवर हुबेहूब रेखाटली आहेत.